# जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : **chandrapur.rdc@gmail.com** फोन क्रमांक - 07172-250659
क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/ 490 दिनांक :- 21 मे, 2020

---

**संदर्भ** :- 1. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिसुचना क्रं.डीएमयु/2020/सीआर-92/डिआयएसएम-1 दिनांक 17.04.2020, दि. 02.05.2020. दि. 17.05.2020 व दिनांक 19.05.2020.
2. या कार्यालयाचे आदेश क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/473/2020 दि. 17.05.2020.

## -: परिपत्रक :-

महाराष्ट्र राज्यांतर्गत कोरोना विषाणुचा (कोविड-19) प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असुन महाराष्ट्र शासन, आरोग्य विभागाव्दारे कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता साथरोग प्रतिबंध कायदा, 1897 लागु करुन त्यातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यात आली आहे व त्याकरिता अधिसुचना व नियमावली निर्गमित करण्यात आल्या आहेत.

तसेच जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, महाराष्ट्रात गतीने पसरत आहे असे दिसुन येत आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणु (कोविड-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचा रोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दि. 13.02.2020 पासुन लागु करुन खंड 2,3 व 4 मधील तरतुदींनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आलेली आहे. त्याशिवाय भारत सरकार, आरोग्य मंत्रालय, महाराष्ट्र सरकार, आरोग्य मंत्रालय यांनी जाहीर केलेप्रमाणे कोरोनाग्रस्त रुग्णांचे संपर्कात लोकांनी येवु नये, तसेच सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येणे, थांबणे, चर्चा करणे, धार्मीक,राजकीय व सामाजिक, सांस्कृतिक, क्रिडाविषयक प्रदर्शने व शिबीरे, सभा, मेळावे,जत्रा, यात्रा, रॅली, धरणे आंदोलन, इ. कार्यक्रमांचे आयोजनास मनाई करण्यात आली असुन सदर कार्यक्रमांना मंजुरी दिल्यास या विषाणुचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरुन सर्वसामान्य जनतेचे व त्यांचे आरोग्याची धोकादायक परिस्थीती निर्माण होत आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासनाने संदर्भिय आदेशान्वये, संपुर्ण महाराष्ट्रात लोकांच्या दैनंदिन व्यवहारास प्रतिबंध घालुन लॉकडाऊन घोषीत केलेला आहे संदर्भिय आदेशाच्या अनुषंगाने चंद्रपूर जिल्हयात सुध्दा लोकांच्या दैनंदिन व्यवहारास काही प्रमाणात शिथीलता देऊन संचारबंदी लागु करण्यात आलेला आहे. त्यामध्ये जिवनावश्यक व जिवनावश्यक व्यतिरिक्त सर्व प्रकारची दुकाने / आस्थापना, सलुन, केस कर्तनालय इ. दुकान/आस्थापना, खाजगी कार्यालय यांना ठरवुन देण्यात आलेल्या निर्धारीत वेळेत सामाजिक अंतर राखणे, किमान ग्राहकांची उपस्थिती ठेवणे, ग्राहकांना हात धुण्याची सोय असणे, मास्कचा नियमीत वापर करणे इ. अटी व शर्तीवर सुरु ठेवण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

त्याअनुसार जिल्हा प्रशासनाकडून उपरोक्त अटी-शर्तीवर सदर आस्थापना/दुकाने उघडण्यास परवानगी देण्यात आलेली आहे त्या अटी-शर्तीचा भंग झाल्यास जसे ग्राहकांमध्ये सामाजिक अंतर न राखणे, दुकान/आस्थापना यांचे ठराविक कालावधीनंतर निर्जंतुकीकरण न करणे, ग्राहक व कार्यरत कामगार यांचेकडून मास्कचा वापर न होणे, ग्राहक व कार्यरत कामगार यांचेकरीता हात धुण्याकरिता साबन किंवा हॅण्ड सॅनिटायजर्स न ठेवणे इ. बाबी निदर्शनास आल्यास किंवा सामान्य नागरीकांकडून याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास सदर दुकान/आस्थापना प्रशासनाकडून कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ बंद करण्यात येईल याची कृपया उपरोक्त दुकान/आस्थापना चालकांनी नोंद घ्यावी.

जिल्हादंडाधिकारी कार्यालय चंद्रपूर

(डॉ. कुणाल खेमनार)
जिल्हादंडाधिकारी,
चंद्रपूर

**प्रतिलीपी :- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.**

1. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
3. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर
4. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
5. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
6. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, (सर्व)
7. मुख्याधिकारी, नगर परिषद/ नगर पंचायत (सर्व)
8. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर

**सदर परिपत्रकास उपरोक्त अधिकारी यांनी आपले स्तरावरुन प्रसिध्दी द्यावी.**

जिल्हादंडाधिकारी,
चंद्रपूर